ई-मेल द्वारे

**जिल्हा व सत्र न्यायालय, अहमदनगर**

---

संदर्भ : दिनांक ०३/१०/२०२४ रोजी प्रसिध्द झालेली **लघुलेखक (श्रेणी-३)** पदाची निवड यादी.
संदर्भ : जिल्हा न्यायालय आदेश क्र.बी-०४/आस्था.१९१५/२०२६, दिनांक १३/०७/२०२६.
संदर्भ : जिल्हा न्यायालय, आदेश क्र.बी-०४/आस्था.१९१६/२०२६, दिनांक /०७/२०२६.

---

**आ दे श :-**

**क्रमांक बी-०४/आस्था.१९/ १७ /२०२६** :- प्रमुख जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर हे खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेत. **सदरचा आदेश दिनांक २३/०७/२०२६ रोजी मध्यान्हपूर्व पासून अंमलात येईल.**

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव, निवड यादीतील क्रमांक व पत्ता. | नविन नेमणूकीचे ठिकाण. |
|---|---|---|
| १) | श्री. प्रथमेश योगेश जोशी, लघुलेखक (श्रेणी-३) पदाच्या निवड यादीवरील **क्र.४६**, रा. एन-७, सिडको, ता. जि. छत्रपती संभाजीनगर. | **तदर्थ स्वरुपात (Ad-hoc basis) नविन नेमणुकीने** लघुलेखक (श्रेणी-३) या पदी सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, **श्रीगोंदा** येथे श्रीमती नम्रता डी. दावत यांच्या पदोन्नतीमुळे रिक्त झालेल्या पदी. |
| २) | श्रीमती भाग्यश्री बाळकृष्ण बांगर, लघुलेखक (श्रेणी-३) पदाच्या निवड यादीवरील **क्र.४७**, रा. मु.पो. खोकरमोहा, ता. जि. बीड. | **तदर्थ स्वरुपात (Ad-hoc basis) नविन नेमणुकीने** लघुलेखक (श्रेणी-३) या पदी सह दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, **कर्जत** येथे श्री. ए. एस. गडदे यांच्या पदोन्नतीमुळे रिक्त झालेल्या पदी. |

**टिप :-**

१) **उपरोक्त श्री. प्रथमेश योगेश जोशी व श्रीमती भाग्यश्री बाळकृष्ण बांगर यांनी भरती प्रकियेच्या वेळी घेण्यात आलेल्या इंग्रजी लघुलेखन १०० श.प्र.मि. व मराठी लघुलेखन ८० श.प्र.मि.** या परिक्षांमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेले गुण प्राप्त केले नाहीत, त्यामुळे त्यांना सदर परिक्षा त्यांचे नेमणूकीचे दिनांकापासून एक वर्षाचे आत उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील. **परिक्षा उत्तीर्ण न झाल्यास त्यांना सेवेतून कमी (discharged from service) केले जाईल.**

२) उपरोक्त उमेदवारांची नेमणूक ही सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक चारित्र-२०१७/प्र.क. ४८३/२०१७/१६-अ, दिनांक २८ ऑगस्ट २०१७ नूसार उमेदवाराची चारित्र व पूर्वचारित्र याची पडताळणीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. उमेदवाराने सादर केलेली माहिती असत्य आढळून आल्यास प्रस्तुतचा नियुक्ती आदेश रद्दबातल करुन भारतीय दंडसंहितेनूसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल.

३) लघुलेखक (श्रेणी-३) म्हणुन नविन नेमणूक दिलेल्या कर्मचा-यांची **वेतन स्तर-एस १४ (३८६००-१२२८००)** मध्ये नेमणूक करणेत येत आहे.

४) त्यांना सुचित करणेत येते की, त्यांना दिलेली नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपाची असुन त्यांना कोणतेही कारण न देता व नोटीस न देता केव्हाही सेवेतुन कमी करणेत येईल.

५) **तसेच,** लघुलेखक (श्रेणी-३) म्हणून तात्पुरत्या स्वरुपात नविन नेमणूक दिलेल्या सर्व उमेदवारांना सुचित करण्यात येते की, हजर झालेनंतर त्यांना त्यांचे पदाचा राजीनामा दयावयाचा असल्यास त्यांनी सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दिनांक ०२/१२/१९९७ प्रमाणे योग्य तो अर्ज सादर करावा.

६) तसेच त्यांना असेही सुचित करणेत येते की, ते नेमणुक दिलेल्या न्यायालयात सदर आदेश मिळालेपासून ७ दिवसांचे आत हजर न झाल्यास त्यांना देण्यात आलेली नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्यांचे निवड यादीतील नाव कमी करण्यात येईल, याची नोंद घ्यावी

७) उपरोक्त कर्मचा-यांचा हजर झालेबाबतचा अहवाल त्वरीत **ईमेल द्वारे** पाठविण्यात यावा

22/07/2026

( एस. बी. कचरे )
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
**अहमदनगर**

जिल्हा न्यायालय, अहमदनगर, ))
दिनांक : २२/०७/२०२६. ))

**क्रमांक बी-०४/आस्था.१९ १७ /२०२६**

**प्रत माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी अग्रेषीत :-**

१) सर्व संबंधित माननीय कार्यालय प्रमुख.

२) अधीक्षक, कार्यव्य/ले.व वि., जिल्हा न्यायालय, अहमदनगर.

३) वरिष्ठ लिपिक, कार्यव्यवस्थापन विभाग, जिल्हा न्यायालय, अहमदनगर.

४) जिल्हा प्रणाली व्यवस्थापक यांनी प्रस्तुतचा आदेश कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.

५) संबंधित उमेदवार - ई-मेल द्वारे.

६) कार्यालयीन संचिका.

२४/०७/२६

( एस. एन. कडू )
प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, अहमदनगर

जिल्हा न्यायालय, अहमदनगर, ))
दिनांक : /०७/२०२६. ))